योग, प्रयोग व सहयोग
**घंटाळी मित्र मंडळ, योग विभाग, ठाणे.**
सहयोग मंदिर, घंटाळी कॉलनी, सहयोग मंदिर पथ, ठाणे - ४०० ६०२. दूरध्वनी : २५३६ १३ ४१
सोमवार ते शनिवार : सकाळी ११ ते १ व सोमवार ते शुक्रवार : रात्री : ७.३० ते ८.३०
स्थापना : २६ जानेवारी १९६५ संस्थापक : योगाचार्य श्रीकृष्ण व्यवहारे
E-mail : gmmyoga@yahoo.co.in Website: www.gmmyoga.org

# सुवर्ण महोत्सवी वर्ष

**(२०१४ - २०१५)**

ठाणे - २
... डिसेंबर २०१४

____________________________
____________________________
____________________________

**विषय : क्रीडापटूंसाठी 'क्रीडायोग' व्याख्यान व शिबीर (निःशुल्क)**

माननीय महोदय,

सप्रेम नमस्कार. मंडळाचे संस्थापक व योग विभाग प्रमुख योगाचार्य श्रीकृष्ण व्यवहारे (स्वामी सत्यकर्मानंद) यांनी २६ जानेवारी १९६५ रोजी मंडळाची स्थापना केली. या महन्मंगल घटनेस पन्नास वर्षे झाली आहेत. सध्या सुवर्ण महोत्सवी वर्ष धूम धडाक्यात साजरे करण्यात येत आहे. त्यानिमित्त जे रंजक व बोधक कार्यक्रम आत्तापर्यंत सादर करण्यात आले त्यांना ठाणेकर नागरिकांनी प्रचंड प्रतिसाद दिला आहे.

वरील कार्यक्रमाचाच एक भाग म्हणून शनिवार दि.१७ जानेवारी ते शुक्रवार दि.२३ जानेवारी २०१५ दरम्यान घंटाळी भागातील सहयोग मंदिरात 'योग जागृती सप्ताह' 'Yoga Awakening Week' आयोजित करण्याचे मंडळाच्या योग विभागाने ठरविले असून, बरीचशी पूर्वतयारी झाली आहे. या जागृती सप्ताहाचे निमित्ताने प्रबोधनाचे व प्रात्यक्षिकांचे बहुविध कार्यक्रम सकाळी व संध्याकाळी आयोजित करण्यात येणार आहेत. या सर्वांचे विधिवत् उद्‌घाटन शनिवार दि.१७ जानेवारी २०१५ रोजी, सायंकाळी ६ वाजता, सहयोग मंदिरात अणूऊर्जा आयोगाचे माजी अध्यक्ष व श्रेष्ठ वैज्ञानिक मा. डॉ. अनिल काकोडकर यांचे शुभहस्ते होणार आहे.

रविवार दि.१८ जानेवारी २०१५ रोजी सकाळी ९.३० ते १० दरम्यान दृष्टीहिनांची आकर्षक व थरारक दीपासने होतील. त्यानंतर 'क्रीडायोग' या विषयावर नाशिकचे क्रीडामानसतज्ज्ञ मा. भीष्मराज बाम आपले विचार मांडतील. अध्यक्षस्थानी गुरुवर्य अण्णा व्यवहारे असतील व 'योग मानसशास्त्र' या विषयावर बोलतील. 'क्रीडा मानसशास्त्र' व 'योग मानसशास्त्र' मिळुनच 'क्रीडायोग' हा विषय घेतला आहे.

वरील विषय क्रीडापटुंना चांगल्या प्रकारे मार्गदर्शन करणारा असल्यामुळे ठाण्यातील सर्व क्रीडासंस्थांना विनंती आहे की, त्यांनी आपल्या संस्थेतील क्रीडापटुंना व पदाधिकाऱ्यांना या उपयुक्त कार्यक्रमासाठी पाठवावे व या संधिचा योग्य तो लाभ घ्यावा.

## खास क्रीडापटूंसाठी 'आनंद प्राणायाम शिबीर क्र. ३७' (निःशुल्क)

वरील कार्यक्रम हा प्रात्यक्षिकांचा नसून प्रबोधनाचा आहे. प्रात्यक्षिकांसाठी अगदी बसल्या बसल्या करता येईल असे सुलभ 'आनंद प्राणायाम शिबीर' गुरुवर्य अण्णा व्यवहारे निःशुल्क घेणार आहेत. हे अल्पकालीन शिबीर रविवार दि.१ फेब्रुवारी २०१५ रोजी सकाळी ११ ते १.३० दरम्यान, तिसरा मजला, सहयोग मंदिर, घंटाळी, ठाणे (प.) येथे घेण्यात येणार आहे. या शिबिराला कोणतेही शुल्क नाही. मात्र वक्तशीरपणा व स्वयंशिस्त अपेक्षित आहे. ऐच्छिक देणग्या स्वीकारल्या जातील. सहभागी क्रीडापटुंनी सोबतचे माहिति पत्रक भरून आपल्या संस्थेकडे २५ जानेवारी २०१५ पर्यंत भरून द्यावे. सर्व क्रीडासंस्थांनी त्यांच्याकडे आलेली माहितीपत्रके २८ जानेवारी २०१५ पर्यंत मंडळाच्या कार्यालयात आणून द्यावीत.

सहभागी क्रीडापटूंनी येताना बरोबर पाण्याची बाटली व आपली पादत्राणे ठेवण्यासाठी प्लॅस्टिकची पिशवी आणावी. चप्पल स्टँड भरल्यावर पादत्राणे इकडे-तिकडे न ठेवता बरोबर आणलेल्या पिशवीत ठेवून, ती पिशवी सभागृहात स्वतःजवळच ठेवावी.

आपल्या नम्र,

| | | |
|---|---|---|
| मृदुला चौधरी | सुनिता मोकाशी | वैशाली पाटील |
| **कार्यवाह** | **शिबीर प्रमुख** | **व्यवस्था प्रमुख** |
| 9022842665 | 9920659013 | 9321463005 |

योग, प्रयोग व सहयोग

**घंटाळी मित्र मंडळ, योग विभाग, ठाणे.**

सहयोग मंदिर, घंटाळी कॉलनी, सहयोग मंदिर पथ, ठाणे - ४०० ६०२. दूरध्वनी : २५३६ १३ ४९

सोमवार ते शनिवार : सकाळी ११ ते १ व सोमवार ते शुक्रवार : रात्री : ७.३० ते ८.३०

स्थापना : २६ जानेवारी १९६५ संस्थापक : योगाचार्य श्रीकृष्ण व्यवहारे

E-mail : gmmyoga@yahoo.co.in Website: www.gmmyoga.org

# क्रीडापटूंसाठी / कलाकारांसाठी 'आनंद प्राणायाम शिबीर क्र.३७'

## सहभागी साधकाची माहिती

१) संपूर्ण नाव : ____________________

२) संपूर्ण पत्ता : ____________________

____________________

३) वय : __________

४) फोन नं. : __________ मोबाईल नं. : __________

५) ई-मेल : ____________________

६) प्रकृतिसंबंधी काही तक्रारी आहेत का? होय / नाही

७) तक्रारी असल्यास, कोणत्या (थोडक्यात) ____________________

____________________

८) पूर्वी शस्त्रक्रिया झाली आहे का? होय / नाही

९) शस्त्रक्रिया झाली असल्यास, कधी व कोणती (थोडक्यात)

____________________

____________________

१०) अन्य विशेष माहिती : ____________________

____________________

साधकाची सही

दिनांक : (नावः ____________________ )